सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 DEC 2017

# उपेक्षित घटकांना समान संधी आवश्यक

## डॉ. मुणगेकर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : सत्ता, संपत्ती आणि त्यायोगे येणारी प्रतिष्ठा हे विषमता निर्मितीचे प्रमुख स्रोत असून ती देशाच्या महासत्ता होण्याच्या मार्गातील प्रमुख अडसर आहे. उपेक्षित घटकांना विकासाची समान संधी देऊन ही विषमता दूर करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत व अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आज येथे व्यक्त केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर. शेजारी डावीकडून डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. जगन कराडे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. प्रल्हाद माने.**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'असमानतेची आव्हाने : स्थानिक ते वैश्विक' विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान झाले. डॉ. मुणगेकर म्हणाले, "समता व स्वातंत्र्य आणि समता की स्वातंत्र्य हा वाद अगदी अरिस्टॉटल व प्लेटोच्या काळापासून आहे. समतारहित समाजात स्वातंत्र्य असू शकत नाही, इतकी त्यांच्यात परस्परपूरकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांना सर्वोच्च स्थान प्रदान केले. वांशिक, लैंगिक, आर्थिक आणि जातीय अशा चार प्रमुख स्तरांवर मानवनिर्मित विषमता अधिष्ठित आहे.''

ते म्हणाले, ''लैंगिक विषमता हा तर जागतिक पातळीवरील विषमतेचा प्रमुख स्रोत आहे. स्त्रीला सर्वत्रच कमी दर्जा दिला जातो. नैसर्गिकदृष्ट्या पुरुषांपेक्षा सक्षम असूनही तिचे अबलापण तिच्यावर पद्धतशीरपणे बिंबविले जाते. महिलांचे जगभरात शोषण झाले; मात्र केवळ भारतातच मनुस्मृतीने त्या शोषणाला धार्मिक अधिष्ठान मिळवून देण्याचे पाप केले. स्त्रियांना या देशात सुरक्षित वाटत नाही. त्यातही दलित स्त्रीही आणखी असुरक्षित आहे. जातिव्यवस्था ही जागतिक स्तरावर अत्यंत अवैज्ञानिक मानली गेलेली गोष्ट भारतात मात्र वास्तवात अस्तित्वात आहे, हे चिंताजनक आहे. या देशाला आंबेडकर कळणार नाहीत, तोपर्यंत या देशाची प्रगती होणार नाही.'' समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

### डॉ. मुणगेकर म्हणतात...

- देशाचे ५८ टक्के राष्ट्रीय उत्पन्न एक टक्का लोकांच्या हातात
- एक तृतीयांश इतके उत्पन्न दोन लाख लोकांच्या हातात
- ९० टक्के लोकसंख्येकडे अवघी १० टक्के संपत्ती



पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 DEC 2017

# सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा हे विषमता निर्मितीचे प्रमुख स्त्रोत : डॉ. मुणगेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सत्ता, संपत्ती आणि त्यामुळे येणारी प्रतिष्ठा हे विषमता निर्मितीचे प्रमुख स्त्रोत आहेत. ही विषमता देशाच्या महासत्ता होण्याच्या मार्गातील प्रमुख अडसर आहे. तो दूर करण्यासाठी तसेच उपेक्षित घटकांना विकासाची समान संधी प्रदान करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभागातर्फे 'असमानतेची आव्हानेः स्थानिक ते वैश्विक' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

डॉ. मुणगेकर म्हणाले, समता की स्वातंत्र्य हा वाद अगदी ॲरिस्टॉटल आणि प्लेटोच्या काळापासून सुरू आहे. समतारहीत समाजात स्वातंत्र्य असू शकत नाही, इतकी त्यांच्यात परस्परपूरकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांना सर्वोच्च स्थान प्रदान केले. जोपर्यंत या देशाला आंबेडकर कळणार नाहीत, तोपर्यंत या देशाची प्रगती होऊ शकणार नाही.



शिवाजी विद्यापीठात व्याख्यानात बोलताना डॉ. भालचंद्र मुणगेकर.

देशातल्या ९० टक्के लोकसंख्येकडे अवघी १० टक्के संपत्ती, तर १० टक्के लोकसंख्येकडे ९० टक्के संपत्ती इतकी आर्थिक विषमता देशात आहे. आपल्या आर्थिक प्रगतीचे लाभ गरिबांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे, हाच यावरील उपाय असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.


### स्त्रीयांचे शोषण खपवून घेता कामा नये

महिलांचे जगभरात शोषण केले जाते. हे खपवून घेता कामा नये. कोल्हापुरात येताना महाराणी ताराराणींचा पुतळा पाहायला मिळतो. हा पुतळा स्त्रीयांना शौर्याची प्रेरणा देत असल्याचे डॉ. मुणगेकर यांनी सांगितले. तोंडी तलाकला आपला विरोध आहेच; पण तो सिद्ध होण्यापूर्वी अजामीनपात्र तीन वर्षांची शिक्षा देण्याला मात्र विरोध आहे, या भूमिकेचाही त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2017

# महासत्तेच्या मार्गात विषमतेचा अडसर

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



**शिवाजी विद्यापीठात व्याख्यानात बोलताना डॉ. भालचंद्र मुणगेकर. डावीकडून डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. जगन कराडे, डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. प्रल्हाद माने.**

**डॉ. मुणगेकर यांचे विद्यापीठात प्रतिपादन**

'सत्ता, संपत्ती आणि त्यायोगे येणारी प्रतिष्ठा हे विषमता निर्मितीचे प्रमुख स्रोत आहेत. ही विषमता देशाच्या महासत्ता होण्याच्या मार्गातील प्रमुख अडसर आहे. तो दूर करण्यासाठी तसेच उपेक्षित घटकांना विकासाची समान संधी प्रदान करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे, 'असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे 'असमानतेची आव्हाने: स्थानिक ते वैश्विक' या विषयावर डॉ. मुणगेकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. मुणगेकर यांनी आपल्या भाषणात विषमतेच्या कारणांची आणि त्यावरील उपायांची मीमांसा केली. ते म्हणाले, 'समता व स्वातंत्र्य' आणि 'समता की स्वातंत्र्य' हा वाद अगदी अरिस्टॉटल आणि प्लेटोच्या काळापासून सुरू आहे. तथापि, समतारहित समाजात स्वातंत्र्य असू शकत नाही, इतकी त्यांच्यात परस्परपूरकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांना सर्वोच्च स्थान दिले. '

मुणगेकर म्हणाले, भारताचे २.४ ट्रिलियन डॉलर (सुमारे १५६ लाख कोटी रुपये) म्हणजे देशाचे जवळजवळ ५८ टक्के राष्ट्रीय उत्पन्न अवघ्या एक टक्का लोकांच्या हाती एकवटलेले आहे आणि सुमारे ५२ लाख कोटी रुपये म्हणजे एक तृतीयांश इतके उत्पन्न देशातल्या दोन लाख लोकांच्या हाती एकवटले आहे.

देशातील मुसलमानांची स्थितीही दलितांपेक्षा वेगळी नाही. मात्र, लोक त्यांच्याकडे संशयाने पाहतात आणि त्या संशयाचे जागतिकीकरण करतात. दारिद्र्य, भेद आणि विषमता या तिन्ही पातळ्यांवर त्यांचे शोषण केले जाते, ही गंभीर बाब असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. तोंडी तलाकला आपला विरोध आहेच, गुन्हा सिद्ध होण्यापूर्वी तीन वर्षांची शिक्षा देण्याला मात्र विरोध आहे.' यावेळी समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला, तर डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

### हेगडेंना काढून टाका

केंद्रीय मंत्री अनंतकुमार हेगडे यांनी संविधान बदलाचे विधान म्हणजे भारतीय लोकशाहीचा अपमान आहे. याशिवाय १३० कोटी लोकांचा देखील अपमान आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी केवळ माफीनामा घेऊन विषय न संपविता मंत्रिमंडळातून काढून टाकावे, अशी मागणी असल्याचे डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 DEC 2017

# विषमता महासत्ता होण्यातील प्रमुख अडसर

## डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सत्ता-संपत्ती आणि त्यायोगे येणारी प्रतिष्ठा हे विषमता निर्मितीचे प्रमुख स्रोत आहेत. ही विषमता देशाच्या महासत्ता होण्याच्या मार्गातील प्रमुख अडसर आहे. तो दूर करण्यासाठी तसेच उपेक्षित घटकांना विकासाची समान संधी प्रदान करण्यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे 'असमानतेची आव्हाने : स्थानिक ते वैश्विक' या विषयावर डॉ. मुणगेकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. मुणगेकर यांनी विषमतेच्या कारणांची आणि त्यावरील उपायांची अत्यंत मुद्देसूद मीमांसा केली. ते म्हणाले, समता व स्वातंत्र्य आणि समता की स्वातंत्र्य, हा वाद अगदी ॲरिस्टॉटल आणि प्लेटोच्या काळापासून सुरू आहे. तथापि, समतारहित समाजात स्वातंत्र्य असू शकत नाही, इतकी त्यांच्यात परस्परपूरकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांना सर्वोच्च स्थान प्रदान केले. जो समाज भावनिक आणि वैचारिक पातळीवर समता मान्य करत नाही, तेथे कायद्याच्या बळावर समता प्रस्थापित करावी लागते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'असमानतेची आव्हाने : स्थानिक ते वैश्विक' या विषयावर बोलताना डॉ. भालचंद्र मुणगेकर.**

ते म्हणाले, भारताचे २.४ ट्रिलियन डॉलर (सुमारे १५६ लाख कोटी रुपये) म्हणजे देशाचे जवळजवळ ५८ टक्के राष्ट्रीय उत्पन्न अवघ्या एक टक्का लोकांच्या हाती एकवटलेले आहे आणि सुमारे ५२ लाख कोटी रुपये म्हणजे एक तृतीयांश इतके उत्पन्न देशातल्या दोन लाख लोकांच्या हाती एकवटले आहे. परिणामी, देशातल्या ९० टक्के लोकसंख्येकडे अवघी १० टक्के संपत्ती, तर १० टक्के लोकसंख्येकडे ९० टक्के संपत्ती इतकी आर्थिक विषमता देशात आहे. आपल्या आर्थिक प्रगतीचे लाभ गरिबांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे, हाच यावरील उपाय आहे.

समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला, तर डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

29 DEC 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**भालचंद्र मुणगेकर :** शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान; 'असमानतेची आव्हाने : स्थानिक ते वैश्विक' याविषयी विवेचन

# देश महासत्ता होण्यातील विषमता प्रमुख अडसर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विषमता निर्मितीचे प्रमुख स्त्रोत हे सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा आहे. आपला देश महासत्ता होण्यातील प्रमुख अडसर ही विषमता आहे. हा अडसर दूर करण्यासह उपेक्षित घटकांना विकासाची समान संधी प्रदान करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'असमानतेची आव्हाने : स्थानिक ते वैश्विक' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. मुणगेकर म्हणाले, समता व स्वातंत्र्य आणि समता की स्वातंत्र्य हा वाद अगदी ॲरिस्टॉटल, 'प्लेटो'च्या काळापासून सुरु आहे. मात्र, समतारहित समाजात स्वातंत्र्य असू शकत नाही, इतकी त्यांच्यात परस्परपूरकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांना सर्वोच्च स्थान प्रदान केले. जो समाज भावनिक आणि वैचारिक पातळीवर समता मान्य करत नाही, तेथे कायद्याच्या बळावर समता प्रस्थापित करावी लागते. प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, विषमता हा या देशाला महासत्ता होण्यापासून रोखणारा घटक आहे. त्यामुळे समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे.

या कार्यक्रमात समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करुन दिला. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे विशेष व्याख्यान झाले.

**भालचंद्र मुणगेकर म्हणाले,**

- देशात लैंगिक, जातीय आणि आर्थिक अशा तीनही स्तरांवरील शोषणाची बळी स्त्री ठरते.
- जातिव्यवस्था ही जागतिक स्तरावर अत्यंत अवैज्ञानिक मानली गेलेली गोष्ट भारतात मात्र वास्तवात अस्तित्वात आहे.
- जोपर्यंत या देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर कळणार नाहीत, तोपर्यंत या देशाची प्रगती होऊ शकणार नाही.
- आर्थिक प्रगतीचे लाभ गरिबांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

Times of India
29 DEC 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK's 2-day workshop for NET, SET on Jan 2

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Centre for Distance Education (CDE) of Shivaji University, Kolhapur (SUK) will conduct a two-day workshop for the National Eligibility Test (NET) and State Eligibility Test (SET) on varsity premises on January 2 and 3.

The workshop is available free of cost for students of MA and MCom courses. A circular from the SUK stated that the centre is working under the mission to bring the underprivileged to the mainstream education and that is why the seminar is free of cost.

"Interested students should definitely attend the program. The resource persons from the state and national level will guide students about the said examinations," the circular said.

The circular added that the workshop will commence at 10 am at the CDE on the varsity campus. Students can contact on 0231-2693771 number for registrations.

It should be noted that the NET enables a candidate to receive Junior Research Fellowship (JRF) of the UGC and/or makes him/her eligible for being appointed as lecturer in the UGC-affiliated universities across the country.

लोकमत

29 DEC 2011

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आज 'आविष्कार' संशोधन महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर पातळीवरील आविष्कार संशोधन महोत्सव आज, शुक्रवारी होणार आहे. विद्यापीठातील लोककला केंद्रात सकाळी अकरा वाजता या महोत्सवाचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते होईल.

यामध्ये पदवी, पदव्युत्तर संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक या गटांतील १३० स्पर्धक सहभागी होतील. महोत्सवाचे संयोजन विद्यापीठातील नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाकडून करण्यात आले आहे. महोत्सवात मानव्यशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, आदी गटात स्पर्धा होणार आहे, अशी माहिती डॉ. ए. एम. गुरव यांनी दिली.

पुढारी

29 DEC 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज आविष्कार महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आविष्कार संशोधन महोत्सव होणार आहे. मानव्यशास्त्र, ललित कला, भाषा आदी विषयांत स्पर्धा होणार आहेत. पदवी, पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होणार आहेत. उद्‌घाटन सकाळी दहा वाजता कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते होणार आहे.

पुढारी
29 DEC 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसंत डहाके यांच्या साहित्यावर शिवाजी विद्यापीठात आज चर्चासत्र

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** कवी, कादंबरीकार व समीक्षक वसंत आबाजी डहाके यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या साहित्यावर शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाने एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शुक्रवारी (दि. २९) सकाळी साडेदहा वाजता वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृह येथे चर्चासत्र होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाने एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. बीजभाषण ज्येष्ठ कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर या करणार आहेत. यावेळी डॉ. वसंत पाटणकर, प्रा. डॉ. सुषमा करोगल, डॉ. अविनाश कोल्हे, डॉ. नितीन रिंढे, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. अविनाश सप्रे हे नामवंत अभ्यासक निबंध सादर करणार आहेत. या चर्चासत्रास उपस्थित रहावे, असे आवाहन मराठी विभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले.

तरुण भारत

29 DEC 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. पवार यांचा उद्या स्मृतिदिन

**कोल्हापूर :** डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोनिनीतर्फे शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचा ३६ व्या स्मृतिदिन शनिवार (३०) रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमध्ये शनिवारी सायंकाळी ६ वाजता शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्राचार्य डॉ. बी. पी. साबळे यांच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. तरी जास्तीत जास्त विद्यार्थी, प्राध्यापकांनी अपस्थित राहावे, असे आवाहन कार्याध्यक्ष डॉ. एस. जे. नाईक यांनी केले आहे.

पुढारी

2 9 DEC 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास उपविजेतेपद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** जळगाव येथे झालेल्या पश्चिम भारत आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पुरुष गट संघास उपविजेतेपद मिळाले. या स्पर्धेसाठी गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आदी विविध राज्यांतील संघांनी सहभाग घेतला होता. उपांत्य फेरीत शिवाजी विद्यापीठ संघाचा सामना जयपूरच्या राजस्थान विद्यापीठ संघाशी झाला. अटीतटीच्या या सामन्यात शिवाजी विद्यापीठास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विद्यांपीठाचा संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. संघाचे प्रशिक्षक प्रा. राजेंद्र रायकर, प्रा. दीपक देसाई, क्रीडा संचालक प्रा. पी. टी. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

2 9 DEC 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविभागीय क्रिकेट : महावीर कॉलेजचा दणदणीत विजय

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय पुरुष क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी महावीर कॉलेजने किसनवीर महाविद्यालय, वाई संघाचा तब्बल २०४ धावांनी पराभव केला. फलंदाजीत विशाल कुकडेच्या ९८ धावा व हर्षल बोरसेचे ५ बळी महावीरच्या संघाचे वैशिष्ट्य ठरले. स्पर्धेचे आयोजन महावीर कॉलेजने केले आहे.

प्रथम फलंदाजी करताना महावीरच्या खेळाडूंनी वाई संघाची गोलंदाजी झोडपून काढली. त्यांच्या विशाल कुकडेने ४० चेंडूंत ९८ धावा केल्या. त्याला विश्वजित देवकांत (३५) व साद मुजावर (३०) यांनी चांगली साथ दिली. या जोरावर महावीरने २८४ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरादाखल खेळणारा किसनवीर वाई संघ केवळ ८० धावा करू शकला. महावीरच्या हर्षल बोरसेने ५, विश्वजित देवकांतने ३, हर्षल पाटीलने २ बळी घेत वाई संघाचे कंबरडे मोडले. त्यामुळे महावीरने पहिल्याच सामन्यात २०४ धावांनी विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2017

# ‘वंचितांपर्यंत शिक्षणाच्या संधी पोहोचवा’

कोल्हापूर टाइम्स टीम

‘समाजातील वंचित घटकांपर्यंत उच्च शिक्षणातील विविध संधी पोहोचविणे हेच आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे ध्येय असले पाहिजे,’ असे प्रतिपादन डॉ. दिलीप पाटील यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाने आयोजित केलेल्या ‘एकविसाव्या शतकातील आजीवन कौशल्ये’ विषयावरील राष्ट्रीय परीषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमेरिकेतील पेनीसिल्वनिया विद्यापीठातील प्रा. मिलिंद रानडे होते.

डॉ. दिलीप पाटील म्हणाले की, एकविसावे शतक ज्ञानाचे शतक आहे. स्वअनुभवावर आधारित अनेक जीवन कौशल्ये येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना, मुख्यत: समाजातील वंचित घटकांना, दुर्लक्षित वर्गाला तसेच मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या घटकापर्यंत म्हणजेच शेतकरी, गृहिणी, कारागीर आदींना देण्याचे काम हे ध्येय समजून अध्ययन विभागाने करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. रानडे यांनी अमेरिकेत निरंतर शिक्षणात चाललेले नवीन प्रयोग व अनुभव सांगितले. भाषा आणि संस्कृती ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून समाजाला उपयोगी पडणारे शैक्षणिक प्रयोग विविध क्षेत्रातही करता येऊ शकतात या बाबतीतील अमेरिकेतील सद्यस्थिती सांगितली.

परीषदेचा समारोप डॉ. भालबा विभूते यांनी निरंतर शिक्षण प्रक्रिया, विविध शैक्षणिक आयोग, विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका याविषयी चर्चा केली. अध्यक्षीय समारोप मानव्यविद्या शाखा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या भाषणाने झाला.